वागदरी साठवण तलाव, ता.उमरगा जि.उस्मानाबाद, या योजनेस देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबत

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१७/(२८८ /२०१७)/ लपा
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u>

१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे जा.क्र.मकृखोविमं/०३/(८१०/२०१५)/प्र.बा. कार्या-४/५३१२/२०१७, दि.१४/१२/२०१७ चे पत्र.

२) शासन निर्णय क्र.साठत १००१/(९/२००१)/लपा-१, दिनांक २०/०७/२००१

<u>प्रस्तावना</u>

वागदरी साठवण तलाव, ता.उमरगा जि.उस्मानाबाद, या योजनेस संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये रु. १७३.३८ लक्ष इतक्या किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि प्रकल्पाचे काम करण्यास प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे वागदरी साठवण तलाव, ता.उमरगा जि.उस्मानाबाद, या योजनेस देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता शासनाने आता वागदरी साठवण तलाव, ता.उमरगा जि.उस्मानाबाद, या योजनेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये दिलेली प्रशासकिय मान्यता या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे. त्यामुळे या योजनेचे लेखे बंद करण्यात यावे तसेच या प्रशासकिय मान्यतेअंतर्गत यापुढे कुठलाही खर्च करण्यात येवू नये.

तसेच एकात्मिक जल आराखड्यातील K-६ Sub basin च्या अंतर्गत वागदरी साठवण तलाव, ता.उमरगा जि.उस्मानाबाद या प्रकल्पाकरिता आरक्षित केलेल्या पाणी वापराबाबत आवश्यक ती कार्यवाही व ISWP मध्ये योग्य त्या सुधारणा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१९११०८५२५१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, serialNumber=8a9bdce987e31fe4e079969a0eb71bce94df0f9984bd752cc203bcd86349bbb5, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2019.09.19 11:15:58 +05'30'

(म.ई.धरणे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

२. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर.

३. वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई ३२
४. नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई ३२.
५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
६. मुख्य अभियंता(विप्र), जलसंपदा विभाग, पुणे.
७. आंतर वित्त सल्लागार व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
९. अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद.
१०. कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद मध्यम प्रकल्प विभाग, उस्मानाबाद
११. कार्यासन अर्थ, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क, महासंचालक, मंत्रालय, मुंबई.
१३. लपा संग्रहार्थ